





मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

शांतिलाल मुथ्था फौंडेशनमधील
वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मूल्यवर्धन शाळा भेटी

# राज्यस्तरीय पाहणी अहवाल

१२ फेब्रुवारी ते २ मार्च २०१६




























# मूल्यवर्धन

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन




विद्यार्थी स्वत:हून
वर्गनियम तयार करतात
आणि
आचरणात आणतात

# अनुक्रमणिका


१. मूल्यवर्धन कार्यक्रमाची पार्श्वभूमी ०४

२. निरीक्षण दौऱ्याची पार्श्वभूमी ०४

३. निरीक्षणाची उद्दिष्टे ०६

४. निरीक्षण दौऱ्याचा अहवाल ०६

अ) जिल्हा परिषद शिक्षक, मुख्याध्यापक, सी. आर. सी. संदर्भातील अहवाल ०६

- काटोल व नरखेड तालुका, जिल्हा नागपूर ०९
- व्हॉटसॲप माध्यमाचा वापर ०९
- शिक्षणाची वारी ०९
- मूल्यवर्धन कार्यक्रमामध्ये सुधारणा १०

ब) एस. एम. एफ जिल्हा समन्वयकाच्या संदर्भातील अहवाल १०

५. कार्यवाहीचे मुद्दे: एस. एम. एफ. साठी ११

६. विद्यापरिषदेने पुढील मुद्द्यावर विचार करावा ही विनंती १२

७. शांतीलाल मुथ्था यांच्या अहवालासंदर्भातील प्रतिक्रिया १३

८. मूल्यवर्धन कार्यक्रम अमंलबजावणी – एक दृष्टीक्षेप १३




## १) मूल्यवर्धन कार्यक्रमाची पार्श्वभूमी:

शांतिलाल मुथ्था फौंडेशनच्या (एस.एम.एफ.) वतीने घटनात्मक मूल्ये जिल्हापरिषदेच्या शाळांमधून जिल्हापरिषदेच्या शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत, विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीने पोहोचावीत या सामाजिक व शैक्षणिक बांधिलकीच्या भावनेतून एस.एम.एफ. व महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १६ नोव्हेंबर २०१५ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम अंमलबजावणी विषयी करार केला. करारामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ या तीन वर्षात मूल्यवर्धन हा कार्यक्रम सुरुवातीला मुंबई शहर वगळता ३४ जिल्ह्यांमधील प्रत्येकी एका केंद्रामध्ये प्रायोगिक स्वरुपात राबविण्याचे ठरले. करारानंतर महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद) व एस.एम.एफ. यांनी अनेक बैठका व कार्यशाळा घेऊन मूल्यवर्धन आराखडा, मूल्यवर्धन उपक्रम, प्रशिक्षण नियोजन व साहित्याला मंजुरी दिली. ३४ जिल्ह्यांतील स्वयंस्फूर्तीने काम करणारे प्रत्येकी एक केंद्र (Cluster) प्रायोगिक अमलबजावणीसाठी निश्चित केले. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील केंद्रप्रमुख व किमान २ शिक्षक यांची मुख्य साधनव्यक्ती या नात्याने निवड केली.

यानंतर विद्यापरिषदेच्या पुढाकाराने या सर्व जिल्ह्यातील मुख्य साधनव्यक्तींसाठी दिनांक २८ डिसेंबर २०१५ ते २३ जानेवारी २०१६ या कालावधीत ४-४ दिवसांच्या ३ कार्यशाळा बीजेएस वाघोली येथील शैक्षणिक पुनर्वसन संकुल येथे आयोजित करण्यात आल्या. साधन व्यक्तीनी प्रशिक्षणानंतर त्यांच्या शाळेत मार्च पर्यंत तीन महिने मूल्यवर्धन कार्यक्रम, उपक्रम यांची अंमलबजावणी करून नंतर आपल्या केंद्रातील सर्व शिक्षकांपर्यंत मूल्यवर्धनची कार्यपद्धती पोहोचवावी असे वेगळ्याप्रकारे शिक्षक प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले. साधन व्यक्तीनीही हे आव्हान आनंदाने आणि आत्मविश्वासाने स्वीकारल्याचे त्यांच्या प्रतिक्रियातून जाणवले करारापासून आजतागायत विद्यापरिषदेचे संचालक श्री. गोविंद नांदेडे, श्रीमती अर्चना कुलकर्णी व श्रीमती संगीता घोडेकर यांच्यासह इतर सर्व तज्ञ मंडळींचे सहकार्य मोठ्या प्रमाणावर लाभल्यामुळे मूल्यवर्धनची यशस्वीतेकडे वाटचाल सुरु आहे. मा. शिक्षण आयुक्त श्री. पुरुषोत्तम भापकर व प्राथमिक शिक्षण संचालक श्री. महावीर माने यांचेही मनःपूर्वक सहकार्य मिळत आले आहे.

## २) निरीक्षण दौऱ्याची पार्श्वभूमी:

जिल्हापरिषदेच्या शिक्षकांची पहिली प्रशिक्षण कार्यशाळा दि. ३१ डिसेंबर २०१५ रोजी संपली. त्यानंतर २/३ आठवड्यानंतर शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु होईल असा अंदाज होता. परंतू साधनव्यक्ती शाळेत परतल्यावर लागलीच उत्साहाने कार्यक्रम अंमलबजावणी समारंभपूर्वक सुरु केल्याचा सुखद अनुभव आला. एस.एम.एफ.च्या वतीने पूर्ण महाराष्टामध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या सुरळीत व्यवस्थापनासाठी २० जिल्हा समन्वयकांची पूर्ण महाराष्ट्रासाठी नियुक्ती करण्यात आली. जिल्ह्यात सातत्याने जाऊन शाळा पातळीवर शिक्षकांना येणाऱ्या अडचणी समजून घेण्याची व त्या सोडविण्याची किंवा मुख्य कार्यालयापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

या दरम्यान उत्साही शिक्षक, केंद्रप्रमुख, जिल्हा समन्वयक आणि मुथ्था फौंडेशन यांच्यात मूल्यवर्धन विषयीचे अनुभव, छायाचित्रे, अडचणी, सूचना याची शीघ्र व दैनंदिन देवाण-घेवाण होण्यासाठी एक गट स्थापन केल्याने सर्वांचाच उत्साह शतपटीने वाढला. या पार्श्वभूमीवर या सर्व उत्साहवर्धक घटनांचा आढावा घ्यावा, वर्गातील उपक्रमांची अंमलबजावणी पहावी, शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन संवाद साधावा आणि त्याचबरोबर एस.एम.एफ. मधील अधिकाऱ्यांची जाणीव अधिक समृद्ध व परिपक्व व्हावी यासाठी मूल्यवर्धन प्रयोगिक शाळाभेटी

देण्याची संकल्पना पुढे आली आणि विद्यापरिषदेच्या सहमतीने ती साकारही झाली. यासाठी कार्यालयातील एकूण १८ व्यक्तींचे भेटीचे नियोजन, केंद्रप्रमुख मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधून निश्चित करण्यात आले. ते पुढील तक्त्यात दिले आहे.

## शाळाभेट नियोजन

| अ.क्र. | भेट देणाऱ्या व्यक्तींचे नाव | जिल्हा | केंद्र | शाळेचे नाव | भेट देण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | अशोक गोपाळ<br>सचिन वाळुंजकर | रायगड<br>सातारा | बिरवाडी<br>विडणी | जि.प. प्रा. शाळा बिरवाडी<br>जि. प. प्रा.शाळा माझेरी | १२ फेब्रुवारी'१६<br>१३ फेब्रुवारी'१६ |
| २ | रमेश पानसे<br>व्ही. वेंकटरमणा<br>अमित शिंदे | ठाणे<br>पालघर<br>नाशिक | शहापूर<br>वेवाजी<br>घोटी नं २ | जि.प. प्रा. शाळा कातकरीवाडी<br>जि.प. प्रा.शाळा वेवाजी नानापाडा<br>जि.प.प्रा.मुलींची शाळा घोटी नं २ | १५ फेब्रुवारी'१६<br>१६ फेब्रुवारी'१६<br>१७ फेब्रुवारी'१६ |
| ३ | विद्याधर शुक्ल<br>विनोद खेडलेकर,<br>सोनाली पोवार | कोल्हापूर<br>सांगली | हेरले<br>भवानी नगर | विद्यामंदिर मौजे वडगाव<br>जि.प.प्रा.शाळा मलबाग रेठरेहरणाक्ष | १५ फेब्रुवारी'१६<br>१६ फेब्रुवारी'१६ |
| ४ | लिना देशपांडे<br>सचिन वाळुंजकर | वर्धा<br>चंद्रपूर | झाडगाव<br>कोठारी | जि. प. प्रा.शाळा धामणगाव<br>जि. प. प्रा.शाळा कवडजई | १५ फेब्रुवारी'१६<br>१७ फेब्रुवारी'१६ |
| ५ | मेघना देसाई<br>सचिन वाळुंजकर | नागपूर<br>गडचिरोली | पराडसिंगा<br>तालोडी | जि.प. प्रा. शाळा पराडसिंगा<br>जि. प. प्रा.शाळा खोरदा | १६ फेब्रुवारी'१६<br>१८ फेब्रुवारी'१६ |
| ६ | बेला सूद<br>उमेश माळी | औरंगाबाद<br>अहमदनगर | कचनेर<br>शिंगवे तुकाई | जि.प. प्रा. शाळा खोडेगाव<br>जि.प.प्रा.शाळा वांजोळी | १६ फेब्रुवारी'१६<br>१७ फेब्रुवारी'१६ |
| ७ | रत्ना गोसावी<br>मीनल दशपुत्रे<br>सुनिल चौधरी | उस्मानाबाद<br>सोलापूर | निपाणी<br>वांगी | जि.प.प्रा.शाळा झेंडेवाडी<br>जि.प.प्रा.शाळा आदिनाथ कारखाना | १५ फेब्रुवारी'१६<br>१६ फेब्रुवारी'१६ |
| ८ | बाबाजी म्हस्के<br>बाळासाहेब ठोंबरे | नंदुरबार<br>धुळे<br>जळगाव | पिंपलोड<br>निमगुळ<br>शिरसोली | जि.प. प्रा. शाळा दाकणपाडा<br>जि. प. प्रा.शाळा निमगुळ<br>जि. प. प्रा.शाळा शिरसोली | १५ फेब्रुवारी'१६<br>१६ फेब्रुवारी'१६<br>१७ फेब्रुवारी'१६ |
| ९ | सोनाली पोवार | रत्नागिरी<br>सिंधुदुर्ग | पुनस<br>इन्सुली | जि.प. प्रा. शाळा कुरणे नं २<br>जि. प. प्रा.शाळा इन्सुली नं ४ | २५ फेब्रुवारी'१६<br>२६ फेब्रुवारी'१६ |
| १० | सचिन वाळुंजकर | लातूर<br>नांदेड<br>हिंगोली | महमदापूर<br>चौफाळा<br>शाखा बसमत | जि.प. प्रा. शाळा भडगाव<br>जि. प. प्रा.शाळा कामठा<br>जि. प. प्रा.शाळा किन्होळा | २३ फेब्रुवारी'१६<br>२४ फेब्रुवारी'१६<br>२५ फेब्रुवारी'१६ |
| ११ | अमित शिंदे | अमरावती<br>अमरावती<br>अकोला<br>बुलढाणा | आसरा<br>चाकरदा<br>शिवार<br>शेलापूर खा. | जि.प. प्रा. शाळा आसरा<br>जि. प. प्रा.शाळा हतनाडा<br>जि. प. प्रा.शाळा खरप बुद्रुक<br>जि. प. प्रा.शाळा तळणी | २३ फेब्रुवारी'१६<br>२४ फेब्रुवारी'१६<br>२५ फेब्रुवारी'१६<br>२६ फेब्रुवारी'१६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | सुनिल चौधरी | वाशिम<br>यवतमाळ | मारसूळ<br>कोल्ही | जि.प. प्रा. शाळा अनसिंग<br>जि. प. प्रा.शाळा मालेगाव | २५ फेब्रुवारी'१६<br>२६ फेब्रुवारी'१६ |
| १३ | बाळासाहेब ठोंबरे | नागपूर<br>भंडारा<br>गोंदिया | पराडसिंगा<br>आंधळगाव<br>तिल्लीमोहगाव | जि.प. प्रा. शाळा डिग्रस<br>जि. प. प्रा.शाळा धरमापुरी<br>जि. प. प्रा.शाळा तिल्ली मोहगाव | २३ फेब्रुवारी'१६<br>२४ फेब्रुवारी'१६<br>२५ फेब्रुवारी'१६ |
| १४ | रत्ना गोसावी,<br>उमेश माळी | बीड | पारगाव<br>जोगेश्वरी | जि.प. प्रा. शाळा सांगवी | २३ फेब्रुवारी'१६ |
| १५ | बाबाजी मस्के | जालना<br>परभणी | वाघरूळ<br>केकर जावळा | जि.प. प्रा. शाळा कडवंचीवाडी<br>जि. प. प्रा.शाळा कुंभारी | २५ फेब्रुवारी'१६<br>२६ फेब्रुवारी'१६ |
| १६ | उमेश माळी,<br>शम्मी लाक्रा | पुणे | राहू | जि.प. प्रा. शाळा देवकरवाडी | २५ फेब्रुवारी'१६ |
| १७ | उमेश माळी,<br>शम्मी लाक्रा | पुणे | बेबेडओहोळ | जि.प. प्रा. शाळा पाचाणे | २६ फेब्रुवारी'१६ |
| १८ | रमेश पानसे,<br>अमित शिंदे,<br>अरुण गोखले,<br>वसंत बार्वे | पुणे | दारूम्ब्रे | जि.प. प्रा. शाळा साळूम्ब्रे | १ मार्च'२०१६ |

## ३) निरीक्षणाची उद्दिष्टे:

३४ जिल्ह्यांमध्ये जिल्हापरिषदेच्या मूल्यवर्धन प्रायोगिक शाळांमध्ये जाऊन प्रत्येक वर्गात कमीत कमी २ तासिकांचे निरीक्षण करणे, शिक्षक, मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांच्याबरोबर चर्चा करणे, विद्यार्थ्यांबरोबर हितगुज करणे, शक्य झाल्यास एस.एम.सी.सदस्य व लोकप्रतिनिधी यांच्या भावना जाणून घेणे हे उद्देश डोळ्यासमोर ठेवण्यात आले होते. याशिवाय जिल्हा समन्वयक शिक्षक व केंद्रप्रमुखांशी समन्वयाचे काम कशा प्रकारे करीत आहेत, त्यांचा काही अनावश्यक हस्तक्षेप होतो किंवा कसे हे पाहणे हा देखील निरीक्षणाचा महत्वाचा मुद्दा होता. या निरीक्षणासाठी माहीती संकलन प्रपत्रे त्यांच्याकडे देऊन त्यावर आधारित अहवाल मुख्य कार्यालयात पाठविण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या होत्या.

## ४) निरीक्षण दौऱ्याचा अहवाल:

### अ) जिल्हा परिषद शिक्षक, मुख्याध्यापक, सी.आर.सी. संदर्भातील अहवाल :

मूल्यवर्धन कार्यक्रमाची अत्यल्प माहिति असणारे जिल्हापरिषदेचे शिक्षक व केंद्रप्रमुख यांना केवळ, ४ दिवसांच्या कार्यशाळेमध्ये मूल्यवर्धन संकल्पना, त्याचे फ्रेमवर्क व त्याची आवश्यकता, याविषयी चर्चा करून प्रत्यक्ष वर्गात विद्यार्थी केंद्रित रीतीने रचनावादाच्या अंगाने मूल्यवर्धन उपक्रम घेण्याचा सराव घेण्यात आला होता. एस.एम.एफ.द्वारे तयार केलेल्या शिक्षक उपक्रम पुस्तिका, विद्यार्थी उपक्रम पुस्तिका व अन्य प्रशिक्षण

साहित्य विद्यापरिषदेकडून मान्य करून घेण्यात आले होते.

३-४ दिवसांच्या कार्यशाळेमुळे शाळापातळीवर फार मोठ्याप्रमाणावर बदल होऊ शकतील अशी अपेक्षा नव्हती. तथापि आम्हाला सांगण्यास आनंद होत आहे की, शाळाभेटीमध्ये या सर्व ठिकाणी शिक्षक व केंद्रप्रमुख मूल्यवर्धनची अंमलबजावणी अतिशय उत्साहाने आणि चांगल्या प्रकारे करताना दिसून आले. एकही ठिकाणी मूल्यवर्धनला शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, एस.एम.सी. सदस्य किंवा लोकप्रतिनिधी यांच्याकडून विरोध दिसून आला नाही, ही या दौऱ्यातील विशेष बाब आहे. प्रत्येक जिल्ह्यात विस्तृत निरीक्षण झाले असून त्यातील ठळक बाबी पुढे मांडल्या आहेत.

**कोल्हापूर** येथील केंद्रप्रमुखांनी एका शाळेत मूल्यवर्धन सुरु करण्याऐवजी केंद्रामधील सर्व शाळांमध्ये स्वयंस्फूर्तीने मूल्यवर्धन सुरु केल्याचे आढळून आले. स्वयंस्फूर्तीने उपक्रमाच्या नोंदीही ते करीत आहेत.

**सांगली** मध्ये एकापेक्षा जास्त शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु आहे. तेथे द्वीशिक्षकी शाळेमध्ये सर्व कामे सांभाळून मूल्यवर्धनची कार्यवाही चांगल्या रीतीने सुरु आहे.

**अहमदनगर, यवतमाळ, गोंदिया व पुणे** येथील इयत्ता ५ वी, ६ वी व ७ वी चे प्रशिक्षणाला आलेले शिक्षक स्वतःचे वर्ग सांभाळून १ ली ते ३ री पर्यंत मूल्यवर्धन शिकवीत आहेत, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यामध्ये मूल्यवर्धनची अंमलबजावणी १ ली ते ३ इयत्ता बरोबरच ५ वी ६ वी ७ वी च्या मुलांसाठीही करण्यात आली.

**पालघर, ठाणे** जिल्ह्यातील मूल्यवर्धन शिक्षक व केंद्रप्रमुख इतके उत्साही होते की त्यांनी एस.एम.एफ.च्या लोकांशी चर्चा करून अतिशय कमी वेळेत सर्व केंद्रामधील मुख्याध्यापकांची बैठक आयोजित करून ती यशस्वी केली.

**उस्मानाबाद व नागपूर** जिल्ह्यात केंद्रामधल्या सर्व मुख्याध्यापकांच्या बैठकीमध्ये मूल्यवर्धन या विषयाची कल्पना देण्यात आली व ते सर्वजण मूल्यवर्धन कार्यक्रम त्यांच्या शाळांमध्ये घेऊन जाण्यास उत्सुक आहेत.

**उस्मानाबाद** मध्ये मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनी प्रशिक्षणामुळे स्वतःमध्ये खूपच परिवर्तन झाल्याचे बोलून दाखविले. इतर शिक्षकांनाहि याचा सार्वजनिक जीवनामध्ये खूप फायदा होऊ शकेल, असे त्यांचे मत आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात सर्व शाळा अतिशय दुर्गम भागात आहेत, तरी सुद्धा मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण केंद्रामध्ये घेऊन जाण्यास सज्ञ व उत्साही आहेत.

**औरंगाबाद** येथील शिक्षकांनी मूल्यवर्धनचे वेळापत्रक तयार करून पूर्णपणे मूल्यवर्धनच्या नोंदी लिहिण्यास सुरुवात केली आहे. मूल्यवर्धनबाबत त्यांची समज एस.एम.एफ. कार्यालयातील तज्ज्ञांच्या बरोबरीने असल्याचे दिसून आले.

**जालना** जिल्ह्यामध्ये पथनाट्य, पालकांसाठी विशेष कार्यक्रम अशा वेगवेगळ्या तंत्रांचा वापर करून मूल्यवर्धन पुढे

घेऊन जाण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.
**परभणी व सोलापूर** मध्ये शिक्षक, केंद्रप्रमुख, एस.एम.सी. सदस्य व गावकरी यांचा शाळेच्या कामकाजमध्ये प्रचंड उत्साह असून सर्वजण एकदिलाने मूल्यवर्धन कार्यक्रम पुढे नेण्याचा निर्धार करीत आहेत.

**धुळे, नंदुरबार व अमरावती** जिल्ह्यांमध्ये मराठी भाषेपेक्षा स्थानिक आदिवासी भाषांचा तेथे प्रभाव जास्त आहे. शिकविण्याच्या दृष्टीकोनातून ही एक मोठी अडचण आहे. परंतु शिक्षक व केंद्रप्रमुख मूल्यवर्धनचे मराठीत प्रशिक्षण घेऊन त्या ठिकाणच्या स्थानिक भाषेत हा विषय हाताळीत  आहेत.

**धुळ्यामध्ये** मुख्याध्यापक व ग्रामस्थांनी स्वखर्चाने संपूर्ण शाळा मूल्यवर्धनच्या संकल्पनेवर आधारित चित्रांकित केली आहे व संपूर्ण केंद्रामधील जनतेचे लक्ष वेधून घेतले. नाशिक जिल्ह्यामध्ये असाच आगळा वेगळा प्रयोग सुरु आहे.

**अमरावती** येथील धारणी तालुक्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संपूर्ण तालुक्यात मूल्यवर्धन सुरु करण्याबाबत लेखी पत्र दिले आहे.

**बुलढाणा व वाशीम** जिल्ह्यामध्ये परिपाठाची पारंपारिक पद्धत बदलून बालस्नेही पद्धतीचा अवलंब केला आहे.

**जळगाव** मध्ये सर्व शिक्षक व केंद्रप्रमुख उत्साही असून पूर्ण तयारीनिशी मूल्यवर्धन राबवीत आहेत.

**रायगड व बीड** जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनी इतर शिक्षकांना स्वतःहून मूल्यवर्धनचे प्रशिक्षण दिले व इतर शिक्षकांना मूल्यवर्धन शिकविताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण केले.

**सातारा** जिल्ह्यामध्ये एके ठिकाणी मूल्यवर्धन सुरु असलेली शाळा ही अद्ययावत डिजिटल स्कूल असल्यासारखी आहे. अतिशय प्रगत व तंत्रज्ञानाद्वारा शिक्षण सुरु असले तरी शिक्षक व विद्यार्थ्यांनी मूल्यवर्धन स्वीकारलेले आहे असे दिसते. ग्रामस्थही खूप उत्साही असून लवकरच संपूर्ण केंद्रात मूल्यवर्धन सुरु करण्याचा मानस आहे.

**रत्नागिरी** मध्ये एस.एम.सी. सदस्यांचा उत्साह खूप मोठा असून शिक्षक व केंद्रप्रमुख वाड्या-तांड्यावर जाऊन मूल्यवर्धनची माहिती इतरांना देत आहेत.

**सिंधुदुर्ग, लातूर, नांदेड, हिंगोली, वर्धा, चंद्रपूर, अकोला** या सर्व जिल्ह्यातही शिक्षक व केंद्रप्रमुख अतिशय परिश्रमाने मूल्यवर्धन पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे जाणवले.

जवळजवळ सर्वच जिल्ह्यातील शिक्षक व केंद्रप्रमुख यांनी कार्यक्रम आयोजित करून पालकांना व गावकऱ्यांना मूल्यवर्धन संदर्भातील माहिती देऊन हा कार्यक्रम जनतेपर्यंत पोहचविण्याची भूमिका उत्कृष्टपणे बजावली आहे. व्हॉटसअॅपवर सर्वांचे तसे फोटोही आलेले आहेत.

## ● काटोल व नरखेड तालुका, जिल्हा नागपूर यांचा पुढाकार

विशेष म्हणजे नागपूर येथील काटोल व नरखेड या तालुक्यात स्थानिक लोकप्रतिनिधींनी आग्रह केल्यामुळे विद्यापरिषदेने या दोन्ही तालुक्यातील जिल्हापरिषदेच्या सर्व शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. या जिल्ह्यात एस.एम.एफ.च्या दोन पथकांनी भेट दिली त्यावेळी काटोलमध्ये शिक्षकांनी सर्व पालकांसमोर दुसरीच्या वर्गाचा उपक्रम घेतला. त्यांमध्ये विद्यार्थ्यांनी २० चांगल्या सवयी सांगितल्या व हे सर्व पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले. तसेच दररोजच्या परिपाठामध्ये विद्यार्थी मूल्यवर्धनचे सुविचार सांगतात. या दोन्ही तालुक्यात जिल्हा परिषद, स्थानिक लोकप्रतिनिधी, विद्यापरिषद व एस.एम.एफ. हे सर्वजण मिळून दोन्ही तालुक्यातील शाळांमध्ये मूल्यवर्धनची अंमलबजावणी करून हा प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्रामध्ये यशस्वी होईल हा विश्वास सर्वांच्या मनात निर्माण करतील यात कोणतीही शंका वाटत नाही.

## ● व्हॉटसअ‍ॅप माध्यमातून परस्परसंवाद:

मूल्यवर्धनचे सर्व जिल्ह्यातील शिक्षक व केंद्रप्रमुख यांचा एक व्हॉटसअ‍ॅप ग्रुप तयार करण्यात आला आहे. विद्या परिषदेच्या निवडक अधिकाऱ्यांनाही या गटाचे सदस्य करण्यात आले आहे. त्यामुळे रोजच्या रोज शाळा पातळीवर घडणाऱ्या गोष्टी मुख्य कार्यालयापर्यंत पोहोचत आहेत. व्हॉटसअ‍ॅप ग्रुपमध्ये महाराष्ट्रातील बरेच जिल्हे खूपच सक्रीय आहेत. त्यामध्ये वर्धा, नाशिक, उस्मानाबाद, ठाणे, नागपूर, नांदेड, सोलापूर, बुलडाणा, पालघर, अमरावती, धुळे, यवतमाळ हे जिल्हे सातत्याने त्यांच्या बातम्या, फोटो, व्हिडिओ व प्रतिक्रिया पोस्ट करीत आहेत. इतर सर्व जिल्हेही अधून मधून सहभागी होत आहेत. सोलापूर जिल्ह्यातून शिक्षकांनी व्हॉटसपवर उपक्रम घेत असताना कोणत्या गोष्टी त्यात घेतल्या पाहिजेत व कोणत्या गोष्टी घ्यायला नको यावर सविस्तर अहवाल सादर केला होता. यावर बऱ्याच शिक्षकांनी प्रतिक्रया दिल्या होत्या. शिक्षक उपक्रम घेताना येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाययोजना सुचवीत आहेत.
व्हॉटसअ‍ॅप ग्रुपमध्ये एस.एम.एफ. मुख्य कार्यालयातून प्रत्येक पोस्टला त्वरित उत्तर गेल्यामुळे सर्व शिक्षक समाधानी असून, त्यांच्या कार्याची दाखल घेतल्याची भावना निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. येथून पुढे या माध्यमाचा वापर उपक्रमातील सुधारणा, नवीन सूचना, नाविन्यपूर्ण कल्पना, स्थानिक पातळीवरील आवश्यकतेनुसार बदल करण्याची क्षमता पडताळून पाहून केला जाणार आहे.

## ● शिक्षणाची वारी

पुण्यामध्ये महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाच्या वतीने 'शिक्षणाची वारी' या कार्यक्रमामध्ये मूल्यवर्धनच्या दालनालाही स्थान देण्यात आले होते. भेट देणाऱ्यापैकी ५०० पेक्षा अधिक शिक्षक व केंद्रप्रमुखांनी आमच्याकडे मूल्यवर्धन सुरु व्हावे असे लेखी निवेदन एस.एम.एफ.कडे दिले आहे. विशेष म्हणजे बरेच शिक्षक व मुख्याध्यापक हे स्वतःच्या खर्चाने स्वतःच्या केंद्रामध्ये मूल्यवर्धन घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहेत, हा सगळ्यात महत्वाचा मुद्दा या दौऱ्यातून बाहेर आला.
वरील सर्व चांगल्या व महत्वपूर्ण घटनांच्या बरोबरीने एस.एम.एफ.च्या प्रशिक्षण कार्यशाळेमध्येसुद्धा बऱ्याच सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे दौऱ्यावरून निदर्शनास आले. म्हणून प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये खालीलप्रकारच्या सुधारणा झाल्या पाहिजेत असे सर्व निरीक्षकांनी एकत्रित मुद्दे समोर आणले आहेत ते आपल्या समोर सादर करीत आहोत.

● **मूल्यवर्धन कार्यक्रमामध्ये सुधारणा**

सर्व शाळांमधील केलेल्या निरीक्षणामधून असे ध्यानात आले की शिक्षक आणि केंद्र प्रमुखांच्या प्रशिक्षण कार्यशाळांमध्ये आम्हाला खालील बाबींवर विशेष जोर द्यावा लागेल. जेणेकरून मूल्यवर्धन कार्यक्रमाचे कार्यान्वयन अधिक परिणामकारक होण्यास मदत होईल:

१. प्रत्येक उपक्रम/कृतीचा अधिक प्रभावी परिचय शिक्षकांनी मुलांना करून देणे
२. सहयोगी अध्ययन पद्धतीचा चांगला उपयोग करणे
३. स्वतःचे बोलणे कमी ठेऊन, मुलांना जास्त बोलते करणे
४. मुक्तोत्तरी प्रश्नांचा उपयोग करून मुलांना विचार करण्यास उद्युक्त करणे
५. वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्याची कला मुलांमध्ये रुजवणे
६. विषयाची उकल नैसर्गिकरीत्या, संभाषण करत करणे; फळ्याचा अती वापर टाळणे
७. उपक्रम कंटाळवाणा वाटणार नाही असा खुलवणे
८. बहुवर्ग अध्यापन पद्धती चांगली विकसित करणे
९. कथाकथन प्रभावी होणे
१०. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याकडे उचित लक्ष देणे
११. सकारात्मक शिस्तीचा वापर करणे
१२. उपदेशात्मक भाषेचा वापर टाळणे
१३. नवनवीन उपक्रम व साधन साहित्य बनवणे
१४. मूल्यवर्धन उपक्रमांमधून शिकवलेल्या संकल्पना व तथ्यांची सांगड इतर विषयांशी व वर्गाबाहेरील वर्तनाशी करणे.

## ब) एस.एम.एफ. जिल्हा समन्वयकाच्या संदर्भातील अहवाल

मूल्यवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना कोणत्याही अडचणी आल्या तरी त्या सोडविण्याची यंत्रणा असणे आवश्यक आहे, हा उद्देश समोर ठेऊन एस.एम.एफ.ने महाराष्ट्राच्या विविध भागात शिक्षण क्षेत्रात काम करीत असणाऱ्या जिल्हापरिषदेच्या निवृत्त शिक्षक, केंद्रप्रमुख, उत्साही तरुण मंडळी अशा २० लोकांची जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. या जिल्हा समन्वयकांना एस.एम.एफ.ने सुरुवातीचे ३ महिने सर्व सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच प्रत्यक्ष वर्गामध्ये शिक्षक मूल्यवर्धन विषय कसा हाताळत आहेत हे वर्गात जाऊन निरीक्षण न करण्याविषयी, तसेच जिल्हापरिषदेच्या कार्यपध्दतीमध्ये कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप न करणे, इत्यादी सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. तरीही काही ठिकाणी उत्साहापोटी जिल्हा समन्वयकानी वर्गामध्ये जाऊन निरीक्षण केल्याचेही लक्षात आले. याबाबतीत एस.एम.एफ. व एस.सी.ई.आर.टी. एकत्रित बसून निर्णय घेणे अपेक्षित आहे. एकंदरीत एस.एम.एफ.चे जिल्हा समन्वयक शिक्षक, केंद्रप्रमुख, एस.एम.सी.सदस्य, मुख्याध्यापक या सर्वांशी कोठेही संघर्ष न येता चांगल्या पद्धतीने समन्वय साधित असल्याचे निदर्शनास येत आहे.

## ५) कार्यवाहीचे मुद्दे :एस.एम.एफ. साठी

१. एस.एम.एफ.च्या प्रशिक्षण नियोजनात ज्या ज्या सुधारणा कराव्यात अशा सूचना दौऱ्यामध्ये करण्यात आल्या आहेत, त्या सुधारणा करणे.

२. काही जिल्ह्यामध्ये शिक्षक व केंद्रप्रमुख हे स्वतःहून मूल्यवर्धन प्रशिक्षण घेऊन व मुख्य साधनव्यक्ती बनण्यासाठी पुढे येत आहेत अशा सर्व व्यक्तींची यादी तयार करून त्याबाबत विद्यापरिषदेसमवेत चर्चा करणे.

३. शिक्षक व केंद्रप्रमुख यांचा व्हॉटसप ग्रुप अधिक परिणामकारक करून शिक्षकांना त्या माध्यमाचा वापर करून त्यांचे कार्याची दखल व सूचना देणे  हे काम आणखी तत्परतेने करणे.

४. शिक्षक व केंद्रप्रमुख यांना शाळा पातळीवर जे जे सहकार्य लागेल ते जिल्हा समन्वयक व मुख्य कार्यालयामार्फत त्वरित करणे.

५. दौऱ्यानिमित्ताने ज्या शिक्षकांना आपण आणखी मदत दिली पाहिजे असे वाटत असेल त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना आणखी मदत करणे.

६. ज्या ठिकाणी शिक्षक अतिशय चांगल्याप्रकारे कामगिरी करीत आहेत अशा यशोगाथांची वेगळी नोंद करून त्या सोशल मिडिया किंवा वेबसाईटच्या माध्यमाने लोकांच्या समोर आणणे.

७. जे जिल्हापरिषद शिक्षक उपक्रमाचे चित्रीकरण करून व्हॉटसपवर पाठवून अतिशय चांगले काम करीत आहेत, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चित्रीकरण कसे करावे यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करून सर्वांना पाठविल्या पाहिजेत.

८. सोशल मिडिया उदा. व्हॉटसप, ट्वीटर, फेसबुक, इंटरनेट इत्यादी बाबींचा परिणामकारक वापर करण्याबाबत एस.एम.एफ.च्या वतीने एक धोरण तयार करून सर्व शिक्षकांना जास्तीत जास्त मदत कशी करता येईल यावर कार्य करणे.

९. एस.एम.एफ. मुख्य कार्यालयातर्फे दर आठ दिवसांनी मूल्यवर्धनच्या संदर्भातील महत्वाच्या गोष्टीवर योग्य पद्धतीने सूचना देऊन शिक्षकांना कौशल्य विकासासंदर्भात सातत्याने मदत कशी करता येईल या दृष्टीने प्रयत्न करणे.

१०. शिक्षकांना निरनिराळे संबोध चांगल्या पद्धतीने समजण्यासाठी छोट्या छोट्या व्हिडीओक्लिप्स त्यांच्यापर्यंत पाठविणे.

११. नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड या दोन्ही तालुक्यातील सर्व शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु करण्यासाठी वेगळे नियोजन करणे.

१२. एस.एम.एफ.च्या वतीने जिल्हापरिषदेचे शिक्षक, केंद्रप्रमुख यांना जे प्रशिक्षण दिले आहे ते मूल्यवर्धन राबविण्याच्या संदर्भातील आहे. खऱ्या अर्थाने हे आता मुख्य साधनव्यक्ती  होणार असून त्यांनी इतर शिक्षकांना प्रशिक्षण कसे द्यावे (ट्रेनर्स ट्रेनिंग TOT) यासाठीचे विद्या परिषदेसमवेत नियोजन करून सदर प्रशिक्षण कार्यान्वित करणे.

## ६) विद्यापरिषदेने पुढील मुद्‌द्यावर विचार करावा ही विनंती

१. ज्या शिक्षक व केंद्रप्रमुखांनी पूर्वी प्रशिक्षण घेतले आहे व सध्या अंमलबजावणी करीत आहेत अशा शिक्षकांचे मागील ३ महिन्यातील अनुभव विहित नमुन्यात मागवून घ्यावेत व त्यांची बैठक एप्रिलमध्ये घेवून त्यांचे अनुभवांचे आदान प्रदान करावे.

२. या शिक्षक व केंद्रप्रमुखांसाठी एक कार्यशाळा पुणे येथे घेणे जरुरी आहे.

३. विद्या परिषदेच्या वेबसाईटवर मूल्यवर्धनची माहिती टाकणे, त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जनतेला शासनातर्फे सुरु असलेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाची माहिती मिळू शकेल व मूल्यवर्धन कार्यक्रमाला चालना मिळू शकेल.

४. व्हॉटसॲपवर जे व्हिडिओ येत आहेत त्यातून निवड करुन व संक्षिप्त यादी तयार करून विद्यापरिषद व एस.एम.एफ.च्या वेबसाईटवर टाकणे जेणेकरून जिल्हापरिषदेच्या शिक्षकांचे चांगले काम संपूर्ण महाराष्ट्राला दिसेल.

५. अद्याप मूल्यवर्धन सुरु झाल्याची माहिती वर्तमानपत्रात देण्यात आलेली नाही. परंतु ५० दिवसांच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर यापुढे महाराष्ट्र शासन व विद्यापरिषदेच्या माध्यमाने मूल्यवर्धनची माहिती प्रसिद्ध करण्यास हरकत नाही.

६. ज्या ठिकाणी इयत्ता ६ वी, ७ वी व ८ वीच्या शिक्षकांना मूल्यवर्धनचे प्रशिक्षण दिले आहे अशा ठिकाणी १ ली ते ४ थी च्या शिक्षकांची निवड करून त्यांनाही प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जावी.

७. काही जिल्ह्यांमध्ये नवीन जिल्हापरिषद शिक्षक व केंद्रप्रमुख मूल्यवर्धन प्रशिक्षणासाठी उत्सुक आहेत, अशा शिक्षकांना मूल्यवर्धनचे प्रशिक्षण दिले जावे.

८. एस.एम.एफ.चे जिल्हा-समन्वयक किंवा मुख्य कार्यालयातील निरीक्षक यांनी शाळेमध्ये जाऊन, वर्गामध्ये बसून मूल्यवर्धन तासिकेचे निरीक्षण करावे की नाही या बाबीवर विद्यापरिषदेकडून निर्णय होणे अपेक्षित आहे.

९. काही जिल्ह्यांमध्ये 'होल स्कूल अप्रोचच्या' दृष्टीने मूल्यवर्धन उत्सव, पथनाट्य काही मुख्याध्यापक तयार करीत आहेत. अशा मुख्याध्यापकांचा उपयोग करून होल स्कूल अप्रोच कार्य पद्धती अधिक विकसित करता येईल का यावर विचार करणे.

१०. नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड या दोन्ही तालुक्यातील सर्व शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु करावयाचे असल्यामुळे त्यासाठीचे वेगळे नियोजन करणे.

११. एस.एम.एफ.च्या वतीने जिल्हापरिषदेचे शिक्षक, केंद्रप्रमुख यांना जे प्रशिक्षण दिले आहे ते मूल्यवर्धन राबविण्याच्या संदर्भातील आहे. खऱ्या अर्थाने हे आता मास्टर ट्रेनर होणार असून त्यांना मास्टर ट्रेनरचे प्रशिक्षण देण्यासाठी या सर्वांचे वेळापत्रक निश्चित करणे व एस.एम.एफ.च्या सहाय्याने प्रशिक्षण देणे.

## ७) शांतीलाल मुथ्था यांच्या अहवालासंदर्भातील प्रतिक्रिया:

मूल्यवर्धन कार्यक्रमाची आखणी गेली अनेक वर्षापासून सुरु आहे. आम्ही त्यासाठी नवीन आराखडा (फ्रेमवर्क) तयार करून खूप नवनवीन उपक्रम तयार केलेले आहेत. महाराष्ट्र सरकारने एस.एम.एफ. बरोबर करार करून मूल्यवर्धन कार्यक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी दारे खुली केली, त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा मी आभारी आहे. महाराष्ट्राच्या ३४ जिल्ह्यामध्ये प्रथम एका शाळेमध्ये, नंतर पूर्ण केंद्रामध्ये हा कार्यक्रम सुरु करण्याची योजना आखली असताना पहिल्या फक्त ५० दिवसात हा कार्यक्रम महाराष्ट्रातील सर्व शाळांत १०० टक्के पोहचू शकेल अशी क्षमता या कार्यक्रमात आहे असे दिसून येत आहे. ज्या पद्धतीने विद्यापरिषद सहकार्य करीत आहेत, शिक्षक व केंद्रप्रमुख अहोरात्र मेहनत घेत आहेत, ज्या पद्धतीने विद्यार्थी प्रोत्साहित आहेत, शिक्षक, एस.एम.सी.सदस्य व पालकांचा सहभाग वाढत आहे या सर्व बाबीवरून मूल्यवर्धनचे महत्व सर्वमान्य झाल्याचे दिसून येत.

प्रवास आणखी खूप लांबचा आहे, या गोष्टीची जाणीव आम्हाला आहे. सर्वसाधारणपणे जिल्हापरिषदेच्या शिक्षकांकडे समाज खूप वेगळ्या भावनेने पाहतो. परंतु मला स्वतःला त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत व मूल्यवर्धन कार्यक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम हेच शिक्षक चांगल्याप्रकारे करू शकतात याची मला खात्री आहे. त्यामुळे जिल्हापरिषदेचे शिक्षक, केंद्रप्रमुख, जिल्हा परिषद यंत्रणा, विद्यापरिषद या सर्व यंत्रणेला सहाय्य करण्यासाठी एस.एम.एफ. सज्ज आहे. या निमित्ताने मला सांगावे वाटते – 'Well begun is half done' या इंग्रजी म्हणीप्रमाणे इतक्या कमी वेळात सुरु झालेले मूल्यवर्धनचे काम पुढे घेऊन जाऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्हापरिषद शाळांमध्ये पोहचविण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. हा कार्यक्रम एस.एम.एफ.चा नसून महाराष्ट्र सरकारचा मूल्यवर्धन कार्यक्रम आहे. एस.एम.एफ. त्यासाठी सहकार्य करीत आहे.

## ८) मूल्यवर्धन कार्यक्रम अमंलबजावणी – एक दृष्टीक्षेप

१. ३४ जिल्ह्यांमध्ये मूल्यवर्धन अतिशय उत्साहाने सुरु आहे.
२. शिक्षक व केंद्रप्रमुख हे मूल्यवर्धनमध्ये पूर्णपणे रमून गेले असून प्रत्येक ठिकाणी कार्यरत आहेत.
३. अनेक ठिकाणी इतर केंद्रामध्ये मूल्यवर्धन सुरु करण्याची मागणी केली जात आहे. काही ठिकाणी तर संपूर्ण तालुक्यामध्ये मूल्यवर्धन सुरु करण्याची मागणी येत आहे व तसे पत्र दिले जात आहे.
४. येत्या जूनमध्ये सर्व केंद्रामध्ये मूल्यवर्धन सुरु करावयाचे आहे. परंतु १ जानेवारीपासूनच काही शिक्षक व केंद्रप्रमुख यांनी बऱ्याच ठिकाणी संपूर्ण केंद्रामध्ये मूल्यवर्धन सुरु केल्याचे दिसून येते.
५. जिल्हापरिषदेच्या शिक्षकांना मूल्यवर्धन शिकविणे खूप सोपे झाल्याचे दिसून येते.
६. मुलांचा कृतीमध्ये सहभाग झाल्याचे दिसून येत आहे.
७. उपक्रम घेताना शिक्षकांना काही प्रमाणात रचनावादाचाही परिचय झाल्याचे दिसून येत आहे.
८. एकही शिक्षक अथवा केंद्रप्रमुख यांच्याकडून या कार्यक्रमास विरोध झालेला नाही.
९. केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी, एस.एम.सी. सदस्य, गावकरी यांचा प्रचंड उत्साह दिसून आला.
१०. मुलांना खूप आनंदी वातावरणात बसल्याचे जाणवत आहे.
११. शाळेमध्ये येणाऱ्या मुलांच्या उपस्थितीत काही ठिकाणी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.
१२. एस.एम.एफ. तर्फे एका शाळेत शिक्षकांसाठीची उपक्रम–पुस्तिका देण्यात आली होती परंतु त्या पुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती काढून संपूर्ण केंद्रामध्ये मूल्यवर्धन शिकविले जात आहे.
१३. मूल्यवर्धनने २ महिन्यात मिळविलेले यश पाहता महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये हा विषय हाताळणे नजिकच्या भविष्यकाळात निश्चितपणे शक्य आहे असे अनुमान काढता येईल.

# हे सर्व फोटो शिक्षकांनी व्हॉट्सअॅपवरुन पाठवले आहेत.

**कोल्हापूर** येथील केंद्रप्रमुखांनी एका शाळेत मूल्यवर्धन सुरु करण्याऐवजी केंद्रामधील सर्व शाळांमध्ये स्वयंस्फूर्तीने मूल्यवर्धन सुरु केल्याचे आढळून आले. स्वयंस्फूर्तीने उपक्रमाच्या नोंदीही ते करीत आहेत.



**केंद्र** : हेर्ले  **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, जि. कोल्हापूर
**शिक्षक** : श्री. योगेश पाकले, अरुणा कोठावळे  **मार्गदर्शक** : श्रीमती हेमलता शिंदे
**उपक्रम** : ''हनुमान उडी''

**सांगली** मध्ये एकापेक्षा जास्त शाळांमध्ये मूल्यवर्धन सूरु आहे. तेथे द्वीशिक्षकी शाळेमध्ये सर्व कामे सांभाळून मूल्यवर्धनची कार्यवाही चांगल्या रीतीने सुरु आहे.



**केंद्र** : भवानीनगर  **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, रेठरेहरणाक्ष, जि. सांगली
**शिक्षक** : श्री. गिरीश मोकाशी  **मार्गदर्शक** : श्री. अशोक बनसोडे
**उपक्रम** : ''खूप राग आला आणि काय झाले''

**अहमदनगर, यवतमाळ, गोंदिया व पुणे** येथील इयत्ता ५ वी, ६ वी व ७ वी चे प्रशिक्षणाला आलेले शिक्षक स्वतःचे वर्ग सांभाळून १ ली ते ३ री पर्यंत मूल्यवर्धन शिकवीत आहेत, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यामध्ये मूल्यवर्धनची अंमलबजावणी १ ली ते ३ इयत्ता बरोबरच ५ वी ६ वी ७ वी च्या मुलांसाठीही करण्यात आली.



**केंद्र** : शिंगवे तुकाई
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, वांजोली, जि. अहमदनगर
**शिक्षक** : श्री. उमेश क्षीरसागर
**मार्गदर्शक** : श्री. उत्तम शेलार
**उपक्रम** : ''शांतता संकेत''



**केंद्र** : कोल्ही
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, फाळेगाव, जि. यवतमाळ
**शिक्षक** : श्री.मारुती इडपाते
**मार्गदर्शक** : श्री. पुंडलिक चंदनखेडे
**उपक्रम** : ''माझे मत''

**जि. गोंदिया,** जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांना मूल्यवर्धन उपक्रमाबाबत माहिती देण्यात आली व चर्चा करण्यात आली.



**केंद्र :** मोहगाव तिल्ली  **शाळा :** जि. प. प्रा. शाळा, मोहगाव तिल्ली, जि. गोंदिया
**शिक्षक :** श्री. अनिल मेश्राम, श्री. हिवराज धपाडे  **मार्गदर्शक :** आर. आर. अगडे



**केंद्र :** राहू  **शाळा :** जि. प. प्रा. शाळा, देवकरवाडी, जि. पुणे
**शिक्षक :** संगिता लंघे, उज्वला कुदळे  **मार्गदर्शक :** चंद्रकांत केळकर
**उपक्रम :** ''गटचर्चा करताना इयत्ता पहिलीतील विद्यार्थी''

**पालघर, ठाणे** जिल्ह्यातील मूल्यवर्धन शिक्षक व केंद्रप्रमुख इतके उत्साही होते की त्यांनी एस.एम.एफ.च्या लोकांशी चर्चा करून अतिशय कमी वेळेत सर्व केंद्रामधील मुख्याध्यापकांची बैठक आयोजित करून ती यशस्वी केली.



**केंद्र** : वेवाजी

**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, वेवाजी नानापाडा, जि. पालघर

**मूल्यवर्धन उपक्रमाची सुरूवात :** उपस्थित विस्तार अधिकारी श्री.चापके

**शिक्षक** : श्री. अरविंद कोळी, श्रीमती गीता भोईर

**मार्गदर्शक :** श्री. नवनाथ जाधव



**केंद्र** : शहापूर

**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, कातकरीवाडी, जि. ठाणे

**शिक्षक :** श्री. नितीन हरणे, दामु हिलम

**मार्गदर्शक :** श्री. महेंद्र धिमते

**उपक्रम :** ''चित्र रंगवणे''

**उस्मानाबाद व नागपूर** जिल्ह्यात केंद्रामधल्या सर्व मुख्याध्यापकांच्या बैठकीमध्ये मूल्यवर्धन या विषयाची कल्पना देण्यात आली व ते सर्वजण मूल्यवर्धन कार्यक्रम त्यांच्या शाळांमध्ये घेऊन जाण्यास उत्सुक आहेत.

**उस्मानाबाद** मध्ये मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनी प्रशिक्षणामुळे स्वतःमध्ये खूपच परिवर्तन झाल्याचे बोलून दाखविले. इतर शिक्षकांनाहि याचा सार्वजनिक जीवनामध्ये खूप फायदा होऊ शकेल, असे त्यांचे मत आहे.



**केंद्र** : निपाणी **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, झेंडेवाडी, जि. उस्मानाबाद

**शिक्षक** : श्री. दादासाहेब साळुंके **मार्गदर्शक** : श्री. नारायण तारळकर

**उपक्रम** : ''सहयोगी खेळ''

---

**नागपूर** मूल्यवर्धन बाबत मुख्य शिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा करताना



**केंद्र** : पराडसिंगा **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, पराडसिंगा, जि. नागपूर

**शिक्षक** : श्री. दिलीपराव केणे, श्री. राजू तिजारे, **मार्गदर्शक** : श्री. राजू धावड

**गडचिरोली** जिल्ह्यात सर्व शाळा अतिशय दुर्गम भागात आहेत, तरीसुद्धा मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण केंद्रामध्ये घेऊन जाण्यास सज्ज व उत्साही आहेत.



**केंद्र** : तळोदा
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, खोरदा, जि. गडचिरोली
**शिक्षक** : श्री. अतुल कुनघाडकर
नंदकिशोर ढोले
**मार्गदर्शक** : श्री. गौतम मेश्राम
**उपक्रम** : मूल्यवर्धन उपक्रमांबाबत चर्चा करताना

**औरंगाबाद** येथील शिक्षकांनी मूल्यवर्धनचे वेळापत्रक तयार करून स्वयंस्फूर्तीने मूल्यवर्धनच्या नोंदी लिहिण्यास सुरुवात केली आहे. मूल्यवर्धनबाबत त्यांची समज एस.एम.एफ. कार्यालयातील तज्ञांच्या बरोबरीने असल्याचे दिसून आले.



**केंद्र** : कचनेर
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, खोडेगाव, जि. औरंगाबाद
**शिक्षक** : श्री. गजानन देशमुख
**मार्गदर्शक** : श्री. खांडेभराड
**उपक्रम** : ''इयत्ता २री – भांडणावर उपाय'' सुचविताना व त्यावर गटचर्चा करताना मुले

**जालना** जिल्ह्यामध्ये पथनाट्य, पालकांसाठी विशेष कार्यक्रम अशा वेगवेगळ्या तंत्रांचा वापर करून मूल्यवर्धन पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.



**केंद्र** : वाघूळ
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, कडवंचिवाडी, जि. जालना
**शिक्षक** : श्री. उमेश जोशी
**मार्गदर्शक** : श्री. आर. बी. खराडे
**उपक्रम** : ''इयत्ता १ली मी आणि माझ्या क्षमता''

---

**परभणी व सोलापूर** मध्ये शिक्षक, केंद्रप्रमुख, एस.एम.सी. सदस्य व गावकरी यांचा शाळेच्या कामकाजमध्ये प्रचंड उत्साह असून सर्वजण एकदिलाने मूल्यवर्धन कार्यक्रम पुढे नेण्याचा निर्धार करीत आहेत.




**केंद्र** : केकरजावळा
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, कुंभारी, जि. परभणी
**शिक्षक** : श्री. एस. आर. लिपारे
**मार्गदर्शक** : श्री. राम घटे
**उपक्रम** : ''शाळेत विद्यार्थी अध्ययन करत असताना''



**केंद्र** : वांगी **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, आदिनाथनगर, जि. सोलापूर

**शिक्षक :** श्री. तुकाराम चौधरी, रविंद्र साळुंखे **मार्गदर्शक :** श्री. राजन कुलकर्णी

**उपक्रम :** ''शाळा वाचनालय''

**धुळे, नंदुरबार व अमरावती** जिल्ह्यांमध्ये मराठी भाषेपेक्षा स्थानिक आदिवासी भाषांचा तेथे प्रभाव जास्त आहे. शिकविण्याच्या दृष्टिकोनातून ही एक मोठी अडचण आहे. परंतु शिक्षक व केंद्रप्रमुख मूल्यवर्धनचे मराठीत प्रशिक्षण घेऊन त्या ठिकाणच्या स्थानिक भाषेत हा विषय हाताळीत आहेत.



**केंद्र** : निमगुळ **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, झिरवे, जि. धुळे

**शिक्षक :** श्री. जगन वाडिले, दिपक पाटील **मार्गदर्शक :** श्री. भालचंद्र पाटील

**उपक्रम :** ''माझ्या जबाबदाऱ्या'' या विभागातील ''प्रामाणिकपणे वागू'' या उपक्रमात जोडी चर्चा करताना

धुळ्यामध्ये मुख्याध्यापक व ग्रामस्थांनी स्वखर्चाने संपूर्ण शाळा मूल्यवर्धनच्या संकल्पनेवर आधारित चित्रांकित केली आहे व संपूर्ण केंद्रामधील जनतेचे लक्ष वेधून घेतले. नाशिक जिल्ह्यामध्ये असाच आगळा वेगळा प्रयोग सुरु आहे.



**केंद्र** : पिंपलोड
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, डाकणपाडा, जि. नंदूरबार
**शिक्षक :** श्री. रविकांत मोरे, सुभाष सावंत
**मार्गदर्शक :** श्रीमती ललिता भामरे
**उपक्रम :** ''टिंगल केली तरीही''

---

**अमरावती** येथील धारणी तालुक्यातील गट शिक्षणाधिकाऱ्यांनी संपूर्ण तालुक्यात मूल्यवर्धन सुरु करण्याबाबत लेखी पत्र दिले आहे.



**केंद्र** : आसरा
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, आसरा, जि. अमरावती
**शिक्षक :** श्री. निखिल सवई,
श्रीमती स्वाती आखारे, किर्ती देशमुख
**मार्गदर्शक:** श्रीमती स्मृती बाबरेकर
**उपक्रम :** ''मित्राचे गुण''

**बुलडाणा व वाशीम** जिल्ह्यामध्ये परिपाठाची पारंपरिक पद्धत बदलून बालस्नेही पद्धतीचा अवलंब केला आहे.




**केंद्र** : शेलापूर — **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, तळणी, जि. बुलडाणा

**शिक्षक :** श्री. महेश नाफडे, सुनिल बऱ्हाटे — **मार्गदर्शक :** श्री. देविदास प्राणकर

**उपक्रम :** ''चेष्टा केली तरीही''

---



**केंद्र** : मारसूळ — **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, अनसिंग, जि. वाशिम

**शिक्षक :** श्री. उध्दव जोगदंड, निंबाजी काळबांडे — **मार्गदर्शक** : दिलीप गवई

**उपक्रम :** ''गोष्ट एकून, जोडी चर्चा''

**जळगाव** मध्ये सर्व शिक्षक व केंद्रप्रमुख उत्साही असून पूर्ण तयारीनिशी मूल्यवर्धन राबवीत आहेत.



**केंद्र** : शिरसोली **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, शिरसोली, जि. जळगाव

**शिक्षक :** श्री. राजेंद्र पाटील, प्रमिला दंडगव्हाणे **मार्गदर्शक** : श्री. डी. एन. ठाकूर

**उपक्रम :** ''अभिनय गीत आणि कानगोष्टी''



**केंद्र** : बिरवाडी **शाळा** : जि. प. प्रा. शाळा, बिरवाडी, जि. रायगड

**शिक्षक :** श्री. संदीप भोसले, श्रीमती संपदा उमापे, रेश्मा माने **मार्गदर्शक :** श्रीमती रंजना जाधव

**उपक्रम :** ''चित्र रंगवणे''

**रायगड व बीड** जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनी इतर शिक्षकांना स्वतःहून मूल्यवर्धनचे प्रशिक्षण दिले व इतर शिक्षकांना मूल्यवर्धन शिकविताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण केले.



**केंद्र** : पारगाव जोगेश्वरी

**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, सांगवी, ता. आष्टी, जि. बीड

**शिक्षक :** श्री. शिवाजी कणसे

**मार्गदर्शक :** श्री. त्रिंबक देंडे

**उपक्रम :** ''गोष्ट एकून, जोडी चर्चा''

---

**सातारा** जिल्ह्यामध्ये एके ठिकाणी मूल्यवर्धन सुरु असलेली शाळा ही अद्ययावत डिजिटल स्कूल असल्यासारखी आहे. अतिशय प्रगत व तंत्रज्ञानाद्वारा शिक्षण सुरु असले तरी शिक्षक व विद्यार्थ्यांनी मूल्यवर्धन स्वीकारलेले आहे असे दिसते. ग्रामस्थहि खूप उत्साही असून लवकरच संपूर्ण केंद्रात मूल्यवर्धन सुरु करण्याचा मानस आहे.



**केंद्र** : विडणी

**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, विडणी, जि. सातारा

**शिक्षक :** श्री. लक्ष्मण शिंदे, श्री. भोलचंद बरकडे

**मार्गदर्शक :** श्री. सुंदर बिचकुले

**उपक्रम :** ''कानगोष्टी''

**रत्नागिरी** मध्ये एस.एम.सी. सदस्यांचा उत्साह खूप मोठा असून शिक्षक व केंद्रप्रमुख वाड्या-तांड्यावर जाऊन मूल्यवर्धनची माहिती इतरांना देत आहेत.




**केंद्र** : पुनस
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, कुर्णे क्र. २, जि. रत्नागिरी
**शिक्षक** : श्री. संदीप निखार्गे
**मार्गदर्शक** : श्री. यशवंत पाडवे
**कार्यक्रम** : मूल्यवर्धन कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना उपसभापती श्रीमती घडशी

**सिंधुदुर्ग, लातूर, नांदेड, हिंगोली, वर्धा, चंद्रपूर, अकोला** या सर्व जिल्ह्यातही शिक्षक व केंद्रप्रमुख अतिशय परिश्रमाने मूल्यवर्धन पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे जाणवले.



**केंद्र** : इन्सुली
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, इन्सुली, जि. सिंधुदुर्ग
**शिक्षक** : श्रीमती सुपर्णा भाईप, कविता घुडे
**मार्गदर्शक** : श्री. कमलाकर ठाकूर
**उपक्रम** : ''गटचर्चा, वर्गात सांगणे''



**केंद्र** : महमदापूर
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, भाडगाव, जि. लातूर
**शिक्षक** : श्री. व्ही.टी. बोनवळे
**मार्गदर्शक** : श्री. सी. येडले
**उपक्रम** : ''नियम नसलेली शाळा''




**केंद्र** : वसमत
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, किन्होळा, जि. हिंगोली
**शिक्षक** : श्री. विनायक चव्हाण
**मार्गदर्शक** : पांडूरंग लांडगू
**उपक्रम** : ''सहयोगी खेळ''



**केंद्र** : चौफाळा
**शिक्षक** : श्री. व्ही. बी. पवार, राजेश्वर सोमगेवार
श्रीमती एस. आर. हादवे
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, चौफाळा, जि. नांदेड
**मार्गदर्शक** : श्री. नंदू कवठेकर
**उपक्रम** : ''गटचर्चा''



**केंद्र** : झाडगाव
**शिक्षक** : श्रीमती मनिषा किनगावकर, प्रमोद मुरार
**उपक्रम** : ''माझ्या गावात''
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, धामणगाव, जि. वर्धा
**मार्गदर्शक** : श्री. संजय बैस



**केंद्र** : कोठारी
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, कवडजाई, जि. चंद्रपूर
**शिक्षक** : श्री. रामदास गव्हारे, रविंद्र वनकर
**मार्गदर्शक** : श्रीमती सबतकौर भौंड
**उपक्रम** : ''जोडीचर्चा''



**केंद्र** : शिवार
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, खरप (बु), जि. अकोला
**शिक्षक** : श्रीमती भारती बद्धूरकर
**मार्गदर्शक** : श्री. साहेबराव पातोंड
**उपक्रम** : ''मिळून खाऊया''



**केंद्र** : घोटी
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, घोटी मुली-१, जि. नाशिक
**शिक्षक :** श्रीमती चैताली चंद्रमोरे, अशोक मोरे
**मार्गदर्शक :** श्री. अकबर शेख
**उपक्रम :** ''अध्ययन करताना''



**केंद्र** : आंधळगाव
**शाळा** : जि. प. प्रा. शाळा, आंधळगाव, जि. भंडारा
**शिक्षक :** श्री. पी. एच. चौरवार
**मार्गदर्शक :** श्री. सुभाष मुकुरणे
**उपक्रम :** ''मला काय वाटेल?''

जा.क्र./पंसधा/कार्यालय पं.स.धारणी
दि. २४/२/२०१६

प्रति,
मा. संचालक/व्यवस्थापक,
शांतीलाल मुथ्था फाऊंडेशन, वाघोली, पुणे.

विषय:- मूल्यवर्धन कार्यक्रमाबाबत माहिती पाठविण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, एस. एम. फाऊंडेशन, वाघोली, पुणे अंतर्गत धारणी पंचायत समितीमध्ये चाकर्दा केंद्रातील जि.प. शाळा हतनादा या ठिकाणी इयत्ता १ ते ३ वर्गाकरीता मूल्यवर्धन उपक्रम उत्कृष्टपणे सुरु आहे. सदर मूल्यवर्धन कार्यक्रमाची पाहणी मी स्वत: केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून आपण राबवित असलेला मूल्यवर्धन कार्यक्रम शैक्षणिक दृष्टीने फायदेशिर असल्याने नमूद करावेसे वाटते.

मूल्यवर्धन कार्यक्रम पुढील सत्रामध्ये चाकर्दा केंद्रातील सर्व शाळांमध्ये सुरु केल्यास विद्यार्थ्यांना फायदा होईल. जर आपल्या एस. एम. फाऊंडेशन, वाघोली, पुणे यांनी पं.स. धारणी मध्ये राबविल्यास आम्ही सर्व सहकार्य करु.

पं.स. धारणी मध्ये १८ केंद्र असून जि.प. शाळा १६८ आणि शिक्षक संख्या ६११ आहे.

वरील मूल्यवर्धन कार्यक्रम पं.स. धारणी मध्ये राबवावा, हि विनंती

गट शिक्षणाधिकारी
पं.स. धारणी जि.प.
अमरावती (म.राज्य)

प्रतिलिपी - मा. संचालक, म.रा.शै.सं. व प्र. संस्था पुणे यांना माहिती तथा कार्यवाहीस सादर










SHANTiLAL MUTTHA FOUNDATiON

Level 8, Muttha Chambers II, Senapati Bapat Road, Pune 411016, Maharashtra, India.

+91 20 6605 0191

+91 20 6605 0000

info@mutthafoundation.org

www.mutthafoundation.org